इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (२/२०२६)
स्थायी समिती सभा

दिनांक- २५.०३.२०२६

प्रति.

मा. ----------------------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य / सदस्या,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिका मा. स्थायी समिती सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिका स्थायी समितीची सभा शुक्रवार दि. २७/०३/२०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील स्थायी समिती सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

*******************************************************************************

## परिशिष्ठ

विषय क्र. १ : मागील सभा दि. १२/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रस्तावात नमुद १ ते ११ उद्यानांमध्ये दुरुस्ती कामे करणे आवश्यक असलेने सदर उद्यानांचे कामांसाठी अंदाजपत्रके तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील सन २०२५-२६ व २०२६-२७ या कालावधीकरीता दैनंदीन बाजार फी, मंडप, स्टॉल भाडे इ. वसुली कामी आधारभुत किंमत रु. १,३१,५६,०००/- यावर ई-निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ४ : मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका रविंद्रनाथ टागोर वाचनालयाचे पहिला मजला बांधकाम करणे व फर्निचर काम करणे कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन दिले कामी स्कायटेक कन्सल्टंटस यांचे रक्कम रु. ९५,१०२/- चे देयक अदा करणेस मंजुरी देणेबाबत.

विषय क्र. ५ : इचलकरंजी महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे प्रलंबित लाभ तात्काळ देणेकामी धोरणात्मक व ठोस उपाय योजना करणेसाठी धोरण निश्चित करणेबाबत.

विषय क्र. ६ : खालील अर्जदार यांनी खास जमा झालेली बयाणा / डिपॉझीट रक्कम परत मिळणेची मागणी केलेबाबत.

| अ.क्र. | अर्जदार | रक्कम |
|---|---|---|
| १ | ए.एम.चांडक अॅन्ड कंपनी | ९,०००/- |
| २ | विकास राजेंद्र शिंदे | २७,०००/- |
| ३ | निकोता इंटरप्रायजेस | ९ % डिपॉझिट रु १०,३४,६३४/-<br>मंजुर बयाना रु. ५,४०,११९/- |

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ७ : इचलकरंजी महानगरपालिके करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणुक अथवा इनपॅनेलमेंट करणेकरीता प्रस्तावात नमुद १ ते ११ कन्सल्टंट यांची इनपॅनेलमेंट मध्ये नियुक्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत.

विषय क्र. ८ : मा. सभापती, स्थायी समिती यांचे परवानगीने घेणेत येणारे एनवेळचे विषय.

---

मा. सभापती स्थायी समिती , इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. २५/०३/२०२६ चे आदेशानुसार.

(राहुल बा. पोटे)
प्र.नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०२
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. १२/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

मागील दि. १२/०३/२०२६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : ऋ. बी. कळगते

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०३
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रस्तावात नमुद १ ते ११ उद्यानांमध्ये दुरुस्ती कामे करणे आवश्यक असलेने सदर उद्यानांचे कामांसाठी अंदाजपत्रके तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या अंतर्गत उद्यानाची उद्यान विभागामार्फत स्थळ पाहणी मा. उपायुक्तसो व मा.सहा.आयुक्त यांनी करण्यात आलेली आहे. सदर पाहणी दरम्यान खालीलप्रमाणे दुरुस्ती कामे करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | उद्यानाचे नाव | करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | थोरात चौक येथील ऑक्सिजन पार्क | मुख्य प्रवेश द्वार तसेच संरक्षक भिंतीचे काम |
| २ | शहीद भगतसिंग उद्यान | संरक्षक भिंतीचे काम, मागील द्वार दुरुस्ती, पाण्याचा व्हॉल्व्ह दुरुस्ती |
| ३ | राणी बाग | खेळणी मुख्य प्रवेश द्वार तसेच संरक्षक भिंतीचे काम, पाण्याची सोय करणे |
| ४ | महात्मा गांधी उद्यान (सुंदर बाग) | मुख्य प्रवेश द्वार तसेच संरक्षक भिंतीचे काम |
| ५ | हिरा बाग | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |
| ६ | छ. शिवाजी उद्यान | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |
| ७ | ज्ञानेश्वर उद्यान | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |
| ८ | जवाहरलाल नेहरू उद्यान | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |
| ९ | छ. संभाजी राजे उद्यान | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |
| १० | कमला नेहरू उद्यान | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |
| ११ | कागवाडे मळा उद्यान | मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण |

वरील प्रमाणे ११ उद्यानांचे दुरुस्तीकामी कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव वाचणेत आला.

वरील ११ उद्यानांप्रमाणेच मा. स्थायी समिती सदस्य ता. बा. पोवार यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कॉ. के. एल. मलाबादे उद्यान येथे मुलभूत पायाभूत सुविधा व सुशोभिकरण करणे व गट नं ५९९ वंदेमातरम मैदान जवळील उद्यान येथे ओपन जिम, बालगिक्रिडा साहित्य व इतर अनुशंगीक कामे व सुशोभीकरण करणे हे प्रस्तावही सदर प्रस्तावामध्ये समाविष्ठ करणेत येत आहेत.

तरी वरील प्रमाणे १३ उद्यानांचे दुरुस्तीकामी अंदाजपत्रके तयार करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : दु. बा. कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

मा. स्थायी सभा क्र.०२ | स्था. स. ठराव क्र. ०४
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील सन २०२५-२६ व २०२६-२७ या कालावधीकरीता देनंदीन बाजार फी, मंडप, स्टॉल भाडे इ. वसुली कामी आधारभुत किंमत रु. १,३१,५६,०००/- यावर ई-निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमधील सन २०२५-२६ व २०२६-२७ या कालावधी करिता दैनंदिन बाजार फी, मंडप /स्टॉल भाडे इ. वसुली मक्ता देणे कामी आधारभूत किंमत रु. १,३१,५६,०००/- एवढ्या किंमतीने ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर ई – निविदेस २ (दोन) वेळेस मुदत वाढ देऊन हि केवळ २ ई – निविदाच प्राप्त झाले होते.

लिफाफा क्र. १ उघडल्या नंतर १. आनंद असोसिएट करिता आनंद आत्माराम पोवार व २. अभिषेक पाटील यांनी ई – निविदा सादर केली होती. लिफाफा क्र. १ उघडल्या नंतर आनंद असोसिएट करिता आनंद आत्माराम पोवार यांनी ई-निविदा अटी / शर्ती मान्य असलेबाबत चे कागद पत्र सादर केले नाहीत. तसेच अभिषेक पाटील यांनी अ) इ.पी.एफ रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट. ब) ई-निविदा अटी शर्ती मान्य असलेबाबत कागद पत्रे सादर केली नाहीत. या संदर्भात दोन्ही निविदा धारक यांना उर्वरित कागदपत्रे दि. ०८/१२/२०२५ दुपारी. ०४.०० वा. पर्यंत सादर करण्यास मुदत देण्यात आली होती. मात्र त्यांनी मुदतीत इकडे कागदपत्रे सदर केली नाहीत. त्यामुळे दोन्ही ई-निविदा धारक हे अपात्र झाले आहेत. तसेच मा. अति. आयुक्त यांनी चर्चे अंती फेर ई-निविदा सादर करणे बाबत आदेश दिले.

म.न.पा ने सन २०२३-२४, सालात आधारभूत किंमत रक्कम रु. ९४,००,०००/- ठरविण्यात आली होती. सन २०२३-२४ व २०२४-२५ या दैनंदिन बाजार फी, मंडप /स्टॉल भाडे इ. वसुली मक्ता पद्धतीने मक्तेदार माळी कन्स्ट्रक्शन करिता अमोल माणिक माळी यांना आधारभूत रक्कमे वरती बोली बोलून रक्कम रु. १,०८,७२,७२९/- या मध्ये सन २०२३-२४ व २०२४-२५ या सालात १०% वाढ करून रक्कम रु. १,१९,६०,००४/- इतके आले होते. परंतु सन २०२५-२६ साठी १०% वाढ करून आधारभूत किंमत रु. १,३१,५७,००४/- इतके होते म्हणून सन २०२५-२६ साठी आधारभूत किंमत रु. १,३१,५७,०००/- इतकी धरण्यात आली होती.

या रक्कमेवर ई-निविदा प्रसिद्धी करून व २ वेळा मुदत वाढ देऊन हि निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सन २०२३-२४ या सालामधील धरलेली आधारभूत किंमत ९४,००,०००/- गृहीत धरून सन २०२४-२५ १०% व सन २०२५-२६ १०% वाढ करून रक्कम रु. १,१३,७४,०००/- इतकी आधारभूत किंमत गृहीत धरणे उचित होईल असे इकडील मत आहे.

| अ.क्र | सन (कालावधी) | आधारभूत रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम | रक्कम रु. १,१३,७४,०००/- |
| २ | द्वितीय | प्रथम वर्षाच्या ई निविदा भरलेल्या उच्चत्तम रक्कमेमध्ये ५ % वाढ करून येणारी रक्कम |
| ३ | तृतीय | द्वितीय वर्षाच्या ई निविदा भरलेल्या उच्चत्तम रक्कमेमध्ये ५ % वाढ करून येणारी रक्कम |

तरी निश्चित केलेल्या उक्त नमूद आधारभूत किंमतीवर व मनपा अटी / शर्तीस अधीन राहून ३ वर्षासाठी ई-निविदा प्रक्रिया करणेकामी तसेच निश्चित केलेल्या उक्त नमूद आधारभूत किंमतीवर व मनपा अटी / शर्तीस अधीन राहुन ३ वर्षासाठी दैनंदिन बाजार फी, मंडप /स्टॉल भाडे इ. वसुली मक्ता ई-निविदा प्रक्रिया करणेकामी मंजूरी देणेत येत आहे.

सूचक : सु. बा. कांबळे (?)

अनुमोदक : नि. कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०६
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. ५ : इचलकरंजी महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे प्रलंबित लाभ तात्काळ देणेकामी धोरणात्मक व ठोस उपाय योजना करणेसाठी धोरण निश्चित करणेबाबत.

**ठराव**

श्री. उमाकांत दाभोळे, उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, इचलकरंजी (पश्चिम) यांनी गेल्या काही महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अनेक कर्मचाऱ्यांचे प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युएटी, रजेचे रोखीकरण इ. लाभ प्रलंबित राहिल्याने, त्यांची आर्थिक स्थिती गंभीर होत असून त्यांचे दैनंदिन उदरनिर्वाह, औषधोपचार व कर्जव्यवहार यांवर विपरीत परिणाम होत आहे, शासन निर्णयानुसार निवृत्ती पश्चात लाभ देण्यास विलंब झाल्यास त्यावर व्याज देण्याची तरतूद आहे, चालू आर्थिक वर्ष अंदाजे रु. ३५ ते ४० कोटी घरफाळा वसुली झाली आहे, विविध कंपन्यांच्या रस्ता खुदाई रॉयल्टीमधून रु. २५ ते २६ कोटी जमा झाले आहेत, तरीही कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ दिले नाहीत, ही खेदाची बाब असल्याचे नमूद करून निवेदनकर्त्यांनी खालील मागण्या केल्या आहेत.

(१) सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देयके तात्काळ मंजूर करून वेळबद्ध कार्यक्रम जाहीर करावा,
(२) घरफाळा वसुली व रस्ता खुदाई रॉयल्टीमधून प्राप्त झालेल्या निधीतून प्राधान्याने सेवानिवृत्ती लाभ अदा करावेत,
(३) शासन नियमानुसार विलंब झालेल्या प्रकरणांमध्ये व्याजासह रक्कम देण्याबाबत स्पष्ट आदेश द्यावेत,
(४) प्रकरणे लेखापरीक्षक व संबंधित, विभागात प्रलंबित असल्यास त्यासाठी स्वतंत्र समन्वय समिती स्थापन करून लवकर निपटारा करावा,
(५) भविष्यात अशी विलंबाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी कायमस्वरूपी धोरण निश्चित करावे,

तसेच इतर मक्तेदार व देयके आदा करताना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या लाभांचाही समान व प्राधान्याने विचार न झाल्यास कर्मचारी संघटना यांचेशी विचारविनिमय करून पुढील आंदोलनाचा लढा द्यावा लागेल व त्यास प्रशासन जबाबदार राहील असे निवेदन सादर केले आहे.

याबाबत कार्यालयाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक लाभाच्या रकमा मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने, ज्या क्रमाने प्रदान प्रमाणके आदायगी साठी मुख्यलेखा शाखेकडे दाखल झाली आहेत, त्याच क्रमाने निधी उपलब्धतेनुसार आदा करणेबाबत धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. याकरिता सन २०२६-२७ वार्षिक अर्थसंकल्पात रक्कम रु. ५.०० कोटींची तरतूद करून (उपदानकरिता रु. २.५ कोटी व शिल्लक अर्जित रजा रोखीकरणकरिता रु. २.५ कोटी) त्यामधून प्रलंबित देयके आदा करणे शक्य होईल. तथापि याप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतूद केली तरी, ज्या वेळेस शासन निधी / अनुदान उपलब्ध होईल त्यामधूनही अशी प्रलंबित देयके आदा करणेबाबत कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव सादर केला असुन याबाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबत नमुद केले आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देयके अदा करणेसाठी सन २०२६-२७ वार्षिक अर्थसंकल्पात रक्कम रु. ५.०० कोटींची तरतूद करणेत यावीत (उपदानकरिता रु. २.५ कोटी व शिल्लक अर्जित रजा रोखीकरणकरिता रु. २.५ कोटी) व त्यामधून प्रलंबित देयके अदा करणेत यावीत. तसेच ज्या वेळेस शासन निधी / अनुदान उपलब्ध होईल त्यामधूनही अशी प्रलंबित देयके अदा करणेत यावीत.

सूचक : [signature] सु. वा. कळगाते

अनुमोदक : [signature] नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०७
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. ६ : खालील अर्जदार यांनी खास जमा झालेली बयाणा / डिपॉझीट रक्कम परत मिळणेची मागणी केलेबाबत.

| अ.क्र. | अर्जदार | रक्कम |
|---|---|---|
| १ | ए.एम.चांडक ॲन्ड कंपनी | ९,०००/- |
| २ | विकास राजेंद्र शिंदे | २७,०००/- |
| ३ | निकीता इंटरप्रायजेस | ९ % डिपॉझिट रु १०,३४,६३४/-<br>मंजुर बयाना रु. ५,४०,११९/- |

**ठराव**

खालील अर्जदार यांनी खास जमा झालेली बयाणा / डिपॉझीट रक्कम परत मिळणेची मागणी केली आहे.


| अ.क्र. | अर्जदार | रक्कम |
|---|---|---|
| १ | ए.एम.चांडक ॲन्ड कंपनी | ९,०००/- |
| २ | विकास राजेंद्र शिंदे | २७,०००/- |
| ३ | निकीता इंटरप्रायजेस | ९ % डिपॉझिट रु १०,३४,६३४/-<br>मंजुर बयाना रु. ५,४०,११९/- |


वरील प्रमाणे अर्जदार यांची महानगरपालिकेकडे जमा झालेली रक्कम ही तीन वर्षापुर्वीची असलेने सदरची रक्कम खास जमा झाली असलेने लेखासंहिता २०११ मधील नियम २९९ व ३०० प्रमाणे रक्कम अदा करावयाचे झाल्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

तरी वरील १ ते ३ मक्तेदार यांची खास जमा झालेली रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : (सही) दु. बा. काळगाते

अनुमोदक : (सही) नि. कि. पोवार

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)
सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

मा. स्थायी सभा क्र.०२

स्था. स. ठराव क्र. ०८
दि. २७/०३/२०२६

विषय क्र. ७ : इचलकरंजी महानगरपालिके करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणुक अथवा इनपॅनेलमेंट करणेकरीता प्रस्तावात नमुद १ ते ११ कन्सल्टंट यांची इनपॅनेलमेंट मध्ये नियुक्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत.

## ठराव

उपरोक्त विषयांकीत कामाची जाहिर निविदा मागविणेत आली असून त्याचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे इचलकरंजी महानगरपालिकेकडील बांधकाम विभागाकडून सन २०२५-२६ अंतर्गत जाहिर ई निविदा सुचना क्र.१५/२०२५-२६ इचलकरंजी महानगरपालिकेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणूक अथवा नामिका तयार करणे. नमुद कामाची निविदा दै.लोकमत दै.महासत्ता मध्ये दि.११/११/२०२५ इ. रोजी पेपर प्रसिध्द करणेत आलेली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर दि.११/११/२०२५ इ.रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती. सदरच्या जाहीर ई निविदा क्र.१५/२०२५-२६ मधील तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ दि.२०/११/२०२५ रोजी उघडणेत आला.व पात्र निविदा धारकांचा वित्तीय बोलीचा लिफाफा क्र.२ दि.०२.०२.२०२६ इ. रोजी उघडणेत आला. वित्तीय बोलीच्या लिफाफा क्र.२ नुसार सर्वात कमीचा दर यश बिल्डकॉन व प्लॉनेज कन्स्लटंट या कन्सल्टंट यांचे दर प्राप्त झाले असून उर्वरीत पात्र कंपनीस प्राप्त झालेल्या कमी दरास काम करणेचे विचारणा पत्र देऊन कळविले १२ तासाच्या आत कळविण्यास कळविले असता खालील तक्त्यात नमुद कन्सल्टंट प्राप्त कमी दरास काम करण्यास इच्छुक आहे असे पत्रन्वय १२ तासाच्या आत वेळेत कळविले आहे त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र | निविदा धारकाचे नांव | Description of work/Items | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | After the administrative approval order of the project is issued | After the work order for the project is issued | After 25%of the project is completed | After 50%of the project is completed | After 75%of the project is completed | After 100%of the project is completed | L1 च्या दरात Nego Final Rate |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | स्क्यटेक कन्सल्टंट्स प्रा.लि. | 0.% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 2 | ब्लूस्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट प्रा.लि | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 3 | विठ्ठल तोडकर | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 4 | अमृत इंजिनिअरींग कन्सलटंटस | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 5 | विजय आवटी | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 6 | समर्थ असोसिएटस | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 7 | यश बिल्डकॉन | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 8 | प्रायमुव्ह इंन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलमेंट कंन्सल्टंन्स | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | एन्गार्ज कन्स्ट्रक्शन | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 10 | यश इंनोव्हेटीव सोलूशन्स | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |
| 11 | प्लॅनेंज | 0.250% | 0.150% | 0.200% | 0.200% | 0.200% | 0.200% | 1.2% |

वरील १ ते ११ कन्सल्टंन्ट यांची इचलकरंजी महानगरपालिका प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणूक करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार वरील १ ते ११ कन्सल्टंन्ट यांची इचलकरंजी महानगरपालिका प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : नि. कि. पोवार

अनुमोदक : सु. बा. कळंगते.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner